||अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जनसंपर्क विभाग Public Relations Office

जळगाव दि.५ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभागाच्या पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता दि. १ ऑगस्ट, २०२२ पासून ऑनलाईन प्रवेश दिले जाणार आहे.

तळागाळातील व्यक्ती शिक्षणापासून वंचित राहू नये तसेच ज्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही अथवा नोकरी करीत असल्यामुळे, घराची जबाबदारी अंगावर पडल्यामुळे पुढील शिक्षण घेता आले नाही, अशा विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार व व्यवसाय करणाऱ्या महिला, शासकीय/निमशासकीय कर्मचारी, सामाजिक क्षेत्रात काम करणारी व्यक्ती, सेवा निवृत्त अधिकारी/कर्मचारी अशा सर्वांसाठी बहि:स्थ पद्धतीने प्रवेश सुरु करून शिक्षण प्रवाहात ग्रामीण जनतेला प्राधान्याने उच्च शिक्षणापर्यंत जाण्याची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी पुढाकार घेतला आहे.

या विभागातर्फे मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, संरक्षणशास्त्र, हे विषय घेऊन एम.ए. करता येईल. एम.ए. (शिक्षणशास्त्र) तसेच एम.कॉम. हे अभ्यासक्रम देखील करता येणार आहे. पाठयक्रम हा कबचौउमविचाच राहणार आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा वार्षिक पद्धतीने होतील. प्रवेशीत विद्यार्थ्यांना विषयानुसार स्वयंअध्ययन साहित्य छापिल पुस्तके, मुद्रित, टंकलिखिते वा अनुषंगिक तत्सम साहित्य सॉफ्ट कॉपी स्वरुपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.ठराविक रविवारी अथवा सुटीच्या दिवशी संमंत्रण सत्रांचे आयोजन केले जाईल. विद्यापीठाच्या www.nmu.ac.in संकेतस्थळावर Quick Link अंतर्गत DEEL (External Mode) वर संपूर्ण माहिती पाहता येईल, अशी माहिती संचालक प्रा.आशुतोष पाटील यांनी दिली.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: २७ जुलै, २०२२

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयाच्या दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी